# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शुक्रवार दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ५-०५ वा. वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त, महसूल नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर मोहम्मद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शकुंतला सांडुजी
२४. स.स.श्रीमती मिराबाई रामराव शिंदे
२५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२६. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२७. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२८. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२९. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान

३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३३. स.स.श्री.संजु सुग्रीव रिडलॉन
३४. स.स.सौ.विणा सिध्द गजेंद्र
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३६. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३७. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
३८. स.स.सौ.छाया विलास राऊत
३९. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४०. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४३. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिनसईद
४४. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४५. स.स.श्री.पोळ सरला सखाराम
४६. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४९. स.स.सौ.गायकवाड मंगला प्रकाश
५०. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५५. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५६. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५७. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५९. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
६०. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६१. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६३. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६४. स.स.श्री.शंशाक दामोधर विसपुते
६५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६६. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७१. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७२. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७३. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार
७४. स.स.श्री.विनोद सोनवणे

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**<u>चर्चा :</u>**

श्री.सतीष कटकटे :स.सदस्य श्री.दामोधर शिंदे यांचे वडील स्व.माधवराव शिंदे यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

डॉ.भागवत कराड :स.स.डॉ.आशा बिनवडे यांचे वडील स्व.प्यारेलाल किशनसिंग परदेशी यांचे दु:खद निधन त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:
श्री.अ.साजेद अ.सत्तार :सामाजिक कार्यकर्ते पै.अलाउद्दीन मौजोद्दीन यांचेही दु:खद निधन झाले श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याच वेळी स्व.माधवराव शिंदे स्व.प्यारेलाल किशनसिंग परदेशी तसेच पै.अलाउद्दीन मौजोद्दीन यांचे दु:खद निधन झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्रीमती मेहरून्नीसा खान : सभेला मा.आयुक्त यांची उपस्थिती असणे आवश्यक आहे त्यांना बोलवून घ्यावे.

श्री.सलीम खान :मा.आयुक्तांच्या नावाने प्रस्ताव येतात परंतू आयुक्त सभेला उपस्थित नसतात. विकास कामाचा मुद्दा समोर येतो तेंव्हा गोंधळ होतो सभा तहकूब केली जाते हे योग्य नाही. बजेट बुक केले ते बोगस केले असे मी म्हटले होते. बजेट बुक मधील एकही काम झालेले नाही आयुक्त सभेला उपस्थित नाही ही सभा घेणे कितपत योग्य आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :दि.२०-१०-२००८ रोजीच्या सर्वसाधारण सभेत सर्व सदस्यांनी वार्डात विकास कामे होत नाही असा मुद्दा मांडला होता सभागृहात बोलणे चालू होते त्यात सभा तहकूब करण्यात आली. ११ दिवसात त्यावर कुठलीही चर्चा न होता कोणताही मार्ग प्रशासनाने काढलेला दिसत नाही. सर्वसाधारण सभेत गोंधळ म्हणून सभेला हजर राहणार नाही असे आयुक्तांनी महापौरांना पत्र देवून कळविले अशी माहिती मिळाली, गोंधळ होण्याचे मुळ कारण काय हे प्रशासनाने जाणून घेण्याची गरज होती. विकास कामे होणार नसेल तर तसा खुलासा प्रशासनाकडून घेण्याची आवश्यकता आहे. सभागृहात गोंधळ होतो. प्रशासन काहीच काम करीत नाही, गेल्या आठ महिण्यात किती कामे झाली किती बंद पडलेली आहे त्या कामाची आजची परस्थिती काय हे जाणून घेण्याची गरज आहे.

श्री.संतोष खेंडके :मागिल बैठकीत पुंडलिकनगर ते जयभवानी नगर चौक रस्त्याचे कामाचा मुद्दा मांडला होता अदयाप कामास सुरूवात केली नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जे विषय समोर आलेले आहे त्यावर चर्चा व्हावी विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

श्री.प्रशांत देसरडा :मा.आयुक्त सभेला उपस्थित असणार नाही असे वृत्तपत्रात आले हे सत्य आहे काय?

याचवेळी सभागृहात स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.सय्यद खुसरो :आज रात्रीपासून जकात बंद होणार आहे जो विषय उपकर बसविण्या बाबत समोर आलेला आहे त्यावर चर्चा होवून निर्णय होणे आवश्यक आहे.

श्री.संतोष खेंडके :या बरोबरच विकास कामेही महत्वाची आहे. विकास कामाच्या मुद्यावरून सभा तहकूब होत असेल व मा.आयुक्तांनी मी सभेला उपस्थित राहणार नाही असे म्हटले हे योग्य नसून हा सभागृहाचा अपमान आहे त्यांची काम करण्याची इच्छा नसेल तर नवीन आयुक्त या महापालिकेसाठी दयावे म्हणून शासनाकडे मागणी करावी.

मा.महापौर :आजच्या विषयपत्रिकेवर महत्वाचा विषय आहे आजच्या बैठकीला आयुक्त हजर राहणे आवश्यक होते.

श्री.सलीम खान :शहराचा विकास होत नसेल तर सभा घेवून उपयोग नाही.

मा.महापौर :सदस्यांच्या भावना माझे पर्यंत पोहचल्या आहे सर्वसाधारण सभा महिण्यातून एकदा होते सदस्यांना विकास कामावर चर्चा करण्यासाठी एकदाच संधी येते त्या बाबतीत सविस्तर माहिती मिळण्यासाठी मा.आयुक्त यांनी सभेला उपस्थित असणे आवश्यक आहे अशी भावना सभागृहाची आहे. उपकर लावण्या संबंधी विषय समोर आलेला आहे. त्याविषयी माहिती घेणार आहे सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.सतीष कटकटे :मा.आयुक्त सभेला उपस्थित असणे गरजेचे आहे किंवा नाही.

मा.महापौर :आजच्या सभेला मा.आयुक्त यांनी उपस्थित असणे आवश्यक होते. महत्वाचा विषय आजच्या सभेत आलेला आहे. आयुक्त सभेला का आलेले नाही प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सभेचे विषयाला सुरूवात करावी मा.आयुक्तांनी सभेत उपस्थित राहणार नाही असे पत्र दिले त्यात काय आहे ते पुढच्या सभेच्या वेळी दाखवावे.

डॉ.भागवत कराड :उपकर लावण्याचा विषय महत्वाचा आहे, विकास कामाच्या मुद्यावरून मागिल सभा तहकूब केली. मा.आयुक्तांनी जे पत्र दिले,त्यांना सभेला उपस्थित रहावेच लागेल असे नमूद करून तहकूब सभा जेव्हा आयोजित होईल त्यावेळी त्या त्या सदस्यांनी आपआपले विचार मांडावे,योग्य निर्णय घ्यावा. विषयाला सुरूवात करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :विकासाची कामे चालू आहे असे सभापती यांना वाटत असेल तर त्यांनी तसेच निवेदन करावे त्यांना निवेदन करण्याचा अधिकार आहे.

श्री.गजानन बारवाल :विकास कामाचा विषय तहकूब सभेच्या वेळी घ्यावा. विषयाला सुरूवात करावी.

मा.महापौर :सभागृहाच्या भावना लक्षात आलेल्या आहे. त्यावर पूढील सभेत चर्चा करता येईल महत्वाचा विषय आजच्या सभेत असून विषयाला सुरूवात करीत आहोत.

**<u>विषय क्र.३३१</u> :**

दिनांक २०-१०-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

डॉ.भागवत कराड :दोन पानाचे इतिवृत्त आहे ते स्थगित ठेवून पुढील सभेच्या वेळी घेण्यात यावे.

मा.महापौर :सभा तहकूब झोलली होती सभा पूर्ण झालेली नाही, इतिवृत्त पूढील बैठकीत घेण्यात येईल.

**ठराव :**

इतिवृत्त पुढील सभेत कायम करण्यासाठी ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ३३२ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत आयात होणाऱ्या मालावरती महानगरपालिकेतर्फे जकात कराची आकारणी केली जाते. सद्यस्थितीत जकात कराची वसुली ही खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यात येत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने दिनांक ३ ऑक्टोंबर २००८ रोजी अध्यादेश क्र.७ प्रख्यापित केला आहे. सदरील अध्यादेश खालील प्रमाणे-

१. (१) या अध्यादेशास मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश २००८ असे म्हणावे.
(२) तो तात्काळ अंमलात येईल.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (यात यापूढे ज्याचा निर्देश मुख्य अधिनियम असा करण्यात आला आहे.) याच्या कलम दोन मध्ये,खंड (७० ब) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल.

"(७० क) ज्या शहरामध्ये आयात मालावर यथामुल्य "जकात" किंवा "उपकर" बसविला जातो अशा शहरामध्ये आयात करण्यात येणाऱ्या मालाच्या संबंधात वस्तुचे मुल्य म्हणजे मुळ बीजकामध्ये नमुद केलेले मुल्य, आणि त्यामध्ये अशा वस्तुंवरील जहाज वाहतुक मालप्रेषण विषयक, देय रक्कम,विमा, सिमाशुल्क, उत्पादशुल्क, प्रतिशुल्क, कोणताही विक्रीवर (असल्यास), मुल्यवर्धित कर, परिवहन खर्च,विक्रेत्याचा वाहतुक खर्च,वाहनखर्च आणि इतर सर्व अनुषंगीक खर्च यांचा समावेश होईल.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १२७ मधिल पोट कलम (२) मध्ये, खंड (अअ) मध्ये,पुढील परंतुक ज्यादा दाखल करण्यात येईल.
परंतु राज्य शासनास,राजपत्रातील अधिसुचनेव्दारे महानगरपालिकेला,उपभोग,उपयोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकाती ऐवजी उपकर बसविण्याकरीता,निर्देश देता येतील.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १५२ अ मध्ये पोटकलम (१)नंतर पुढील पोटकलम समाविष्ट करण्यात येईल.
(१अ-१) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी मात्र त्यामधील परंतुकाच्या तरतुदींना अधिन राहून जेव्हा राज्य शासनाने कलम १२७ च्या पोट कलम (२) च्या खंड (अअ) च्या परंतुकान्वये अधिसूचना प्रसिध्द करून उपकर बसविण्याचा निर्देश दिला असेल तेव्हा महानगरपालिका अनुसूची अ मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मालाच्या,शहराच्या हद्दीमध्ये उपभोग,उपयोग किंवा विक्री यासाठी होणाऱ्या प्रवेशावर त्या अनुसूचिच्या स्तंभ (३) मध्ये त्या प्रत्येक मालाच्या समोर विनिर्दीष्ट केलेल्या कमाल दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने उपकर बसविल.

शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार उपकर प्रदानास पात्र असलेल्या वस्तुंवर उपकराची आकारणी करणे तसेच जकाती ऐवजी उपकर शासन अधिसूचनेव्दारे जाहीर करील त्या तारखेपासून अंमलबजावणीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

डॉ.भागवत कराड :मान्यता देण्यात यावी.
मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार सन २००८ चा महाराष्ट्र अद्यादेश क्रमांक ७ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ सुधारणा केल्या प्रमाणे जकाती ऐवजी उपकर शासन अधिसुचनेव्दारे जाहीर करतील त्या तारखेपासून अंमलबजावणी करण्यास मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३३ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांचा लेखाधारित प्रवेश उपकर संदर्भातील अध्यादेश क्र.७ मधील

अनुसूची- ‘‘अ’’ मध्ये उपकराच्या प्रदानास प्राप्त असलेल्या वस्तुंचे कमाल दर दिलेले आहेत. त्याचे विवरण सोबत जोडण्यात येत आहे.

शासनाचा अध्यादेश क्र.७ मध्ये ठरवून दिलेल्या अनुसूची- ‘‘अ’’ च्या स्तंभ-३ मधील उपकराच्या कमाल दरानुसार महाराष्ट्र शासनाची अधिसूचना-क्रं.सीईएस-०२०८/प्र.क्र.५७/नवि-३४, मुंबई -३२ दिनांक २१ ऑक्टोबर -२००८ अन्वये दि.०१ नोव्हेंबर २००८ पासून उपभोग,उपयोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणाऱ्यामालाच्या प्रवेशावर जकाती ऐवजी उपकर बसविण्याचे शासनाने निर्देश दिलेले आहेत.

करिता औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रात शासनाच्या दि.२१.१०.२००८ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे दि.०१ नोव्हेंबर २००८ पासून उपकराच्या प्रदानास पात्र असलेला शासनाचा ‘‘सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रं.७’’ अन्वये अनुसूची- ‘‘अ’’ मधील उपकरास पात्र असलेल्या एकूण ९४ वस्तुनिहाय बाबींवर उपकराचे कमाल दरानुसार लागू करावयाचे दर निश्चित करण्यासाठी तसेच धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

टिप : सोबत अनुसूची- ‘‘अ’’ जोडली आहे.

**<u>संवाद :</u>**

श्री.काशिनाथ कोकाटे :उपकरचा विषय समोर आलेला आहे स.सदस्य आपआपले मत यावर मांडणार आहे या सोबत शासनाचे अध्यादेश दिलेले आहे. अर्थसंकल्प मंजूरीच्या वेळी स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेने मंजूरी देतांना किती उत्पन्न येणार कशावर किती टॅक्स आकारणी करणार यावर चर्चा झाली होती, काही मालावर शासनाचे आदेशानुसार व व्यापाऱ्यांचे मत लक्षात घेता जकातीमध्ये सुट देण्यात आली जकात ऐवजी उपकर ही नवीन प्रणाली शहरामध्ये लागू करीत आहोत. प्रशासन जेव्हा यावर अमलबजावणी करेल त्यावेळी ज्या अडचणी येतील तत्वत: हा उपकर जकातीच्या रूपाने सर्वसाधारण नागरीकांकडून वसूल होणार आहे. त्यामूळे नागरीकांचे यात अक्षेप येवू शकतात. ज्या दराने जकात आकारणी होत होती त्या प्रमाणेच जशाच्या तसे दर ठेवून उपकराची आकारणी व्हावी. मार्च नंतर जे चालू वर्षाचे बजेट येईल तोपर्यत ज्या अडी अडचणी येतील त्या त्रृटया दूर करून त्याप्रमाणे उपकराची वसूली करण्यास मान्यता देता येईल तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:दिनांक ३-१०-२००८ रोजी शासनाचे या संदर्भात अध्यादेश आले. या परिस्थितीत ते आज समोर येते. ३१ तारखेला आज शेवटच्या दिवशी सायंकाळी सभा घेत आहोत आज रात्री १२ पर्यंत जकात बंद होणार उशीरा प्रस्ताव बैठक घेण्याचे कारण काय? अंमलबजावणी करण्यास प्रशासनाला वेळ मिळणार नाही सभा ही यापूर्वीच आयोजित करून निर्णय व्हायला पाहिजे होता. व्यापारी रजिस्ट्रेशन केव्हा करणार किती दिवसाची मुदत देणार आज रोजी रजिस्ट्रेशन झालेले नाही. सर्व मुद्दे समोर यायला पाहिजे नसता कर्मचाऱ्यांचे पगार व विकास कामे कशी करणार त्यासाठी आताच स.सदस्य श्री.कोकाटे यांनी म्हटल्या प्रमाणे जकातीचे दर आकारणी करून कन्टीन्यूव करावे ट्रान्झिस्ट फिस कशी वसूल करणार शासनाने दर व प्रशासनाचे दर मंजूर न करता जशाच्या तसे रेट ठेवावे रजिस्ट्रेशनसाठी आठ दिवसाची मुदत दयावी. ८-१० दिवसात एक कमेटी करावी आठ दिवसात बैठक घेवून योग्य निर्णय यावर घेण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :अद्यादेश आपणास कधी मिळाला. बहुदा २१ तारखेला मिळाला. १ नोव्हेंबर पासून उपकर लागू करावा लागणार हे अद्यादेश दोन महिण्यापूर्वीच

पाठवावयास पाहिजे होते. ३ तारखेला काढत आहेत. यात शासनाची दिरंगाई झालेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :३ ऑक्टोंबर शासनाचा अद्यादेश आहे.

उपआयुक्त (म) :महाराष्ट्र शासनाने जकाती ऐवजी उपकर लावण्याचा अद्यादेश ३ ऑक्टोबर २००८ रोजीचा असून महापालिकेला २० ऑक्टोबर २००८ रोजी प्राप्त झालेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दि.२०ऑक्टोंबर ०८ रोजी अद्यादेश आला उपकर प्रणाली ही नगरसेवकां पर्यत व्यापाऱ्यां पर्यत पोहचून सर्व समजून सांगूण त्यांची नोंदणी करून घेणे यासाठी १० दिवसात महानगरपालिका करू शकते का? शासनाने जकात रद्य करून उपकर लागू केला व्यापा-यावर उपकर केले. शासनाचे अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे जेव्हा उपकराची रक्कम भरणा करावी लागेल तेव्हा व्यापारी शासनाच्या बाबतीत प्रतिक्रिया देतीलच जकात असतांना कोणत्या मालावर कोणते दर होते शासनाने दर काय आहे व आपण काय आकारणी करणार व्यापारी नागरीक यांना सुध्दा कळू दया की शासन काय मदत करीत आहे. प्रस्तावित दर याचा उहापोह व्हावा.

श्री.देसरडा प्रशांत :जकात रद्य केली उपकर लागू केला शासनाचे अभिनंदन परंतु शासन पक्षाच्या ताब्यात असलेल्या महापालिकेला धक्का लागू नये व सेना -भाजप असलेल्या महापालिकेचे वाटोळे व्हावे या हिशोबाने त्या त्या महापालिकेने उपकर लागू करावा म्हणून अध्यादेश काढले ड वर्गामध्ये १४ महापालिका आहे त्या सर्वच ठिकाणी उपकर शासन लागू करीत नाही सातच महापालिकेत लागू करीत आहे. उपकर लागू करायचा होता तर सर्वच ड वर्गात असलेल्या सर्वच महापालिकेत लागू करावयास पाहिजे होता. उपकर लागू करतांना आर्थीक बजेट हे मार्च-एप्रिल मध्ये असते त्या वस्तुस्थितीचा बजेट मध्ये आलेली विकास कामे होणार की नाही याचा विचार शासनाने केलेला दिसत नाही.पाच महिण्याचा उपकर म्हणून अगाऊ रक्कम प्रत्येक महापालिकेला शासनाने दिला पाहिजे अशी मागणी करावी. नसता पगार होणे कठीण होईल महापालिका ही महाराष्ट्रातीलच असून शासनाच्या अखत्यारीत येते त्यासाठी तिचे हित सुध्दा शासनाला लक्षात घ्यावे लागेल. बजेट बुक मधील विकास कामे होणेसाठी विचार करावा लागेल. जळगाव महापालिकेने या वर बैठक घेतली वेगळे निर्णय घेतले शासनाचे प्रतिनिधीच्या माध्यमातून शासनापर्यत या महापालिकेला जावे लागेल वॅट लागू करतांना कोणत्याही प्रकारचा कर शासन लावणार नाही असे जाहीर केले होते. वॅटच्या माध्यमातून शासनाकडे कोटीने रक्कम आलेली आहे नागरीकांनी उपकर सुध्दा का भरावा तो सुध्दा रद्य करावा.वॅटच्या माध्यमातून आलेले शासनाकडील रक्कम ही नगरपालिकेला ज्या पध्दतीने वाटप केली जाते त्या प्रमाणे सर्वच जकात बदं केल्यामूळे वॅटची आलेली रक्कम वाटप करावयास पाहिजे. गुजरात राज्यात उपकर लागू केला जास्त काळ ही प्रोसेस चालू राहिली नाही एक व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्यांकडून माल घेत असेल तर त्यास उपकर लागू होतो. तसे जकातीमध्ये नसते. शासनाने दिलेल्या दर यात शासनाची नेमकी भुमिका काय होती दर लावणार कोणते असा मुद्या समोर येतो यात प्रशासनाने व्यापारी व सदस्यांमध्ये वाद घालण्याचे काम केले आहे. दर ठरविण्याचे अधिकार प्रशासनाचे नसून सर्वसाधारण सभेचे असते.असे असतांना दराची यादी कोणत्या नियमाने व का सादर केली याचा खूलासा

व्हावा.सर्वसाधारण सभेचे अधिकार प्रशासनाने सादर करू नये. उपकर लागू केलेल्या सर्व ड वर्ग महापालिकेचे मा.महापौर यांनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देवून चार पाच महिने उपकराची वसुली होणार नाही नोंदणीसाठी वेळ लागेल महापालिकेचे उत्पन्न येणार नाही त्यामूळे शासनाने पाच महिण्याची अगाऊ रक्कम महापालिकेला देण्याची मागणी करावी. कर्मचाऱ्यांचे पगार व काही प्रमाणात विकास कामे करता येतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शासनाचे या सभागृहात अभिनंदन होते आनंद वाटतो यापूढे ही अशीच भावना असावी. व्यापाऱ्यांनी जकात रद्द व्हावी म्हणून मागणी केली होती. म्हणून सर्वच महापालिकेच्या बाबतीत शासनाने अध्यादेश काढला तो सर्वांना सारखाच असेल.एकटया याच महापालिकेचा विचार केलेला नाही. जकात कन्टीन्यूव व्हावी हे होवू शकते का याचाही प्रयत्न झाला त्यामुळे अध्यादेश आल्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेतलेली नाही जकातीचे जे दर होते तेच यासाठी मान्य करावे.मार्च अखेर ज्या अडीअडचणी येतील त्यावेळी सुधारणा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :जकातीचा जो दर होते तेच दर आकाराचे अशी सभागृहाची भावना आहे शासनाने अध्यादेश काढल्यानुसार उपकर नोंदणीसाठी किती वेळ देणार आहे मुदतीत नोंदणी केली नाही तर काय कार्यवाही करणार आहे.३० दिवसात संपूर्ण रजिस्ट्रेशन प्रशासन करणार आहे का? ३.१०.०८ ला अद्यादेश झाल्यापासून प्रशासनाने काय तयारी केली.

डॉ.भागवत कराड<br>श्री.काशिनाथ कोकाटे } :शासनाचे अद्यादेश केव्हा आले.

उपआयुक्त (म) :शासन अध्यादेश ३ ऑक्टोंबर ०८ रोजीचा असून महापालिकेला २० ऑक्टोंबर रोजी प्राप्त झाला आहे.फॅक्सवर दिनांक सुध्दा आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :३.१०.०८ ला माझेकडे आले. व प्रशासनाकडे आले. शासनाने इंटरनेट वेबसाईटवर टाकलेले जकात चालविण्याचा उद्येश प्रशासनाचा होता त्यामूळे उपकरा बाबत कोणतीच तयारी केलेली दिसून येत नाही.

उपआयुक्त (म) :अध्यादेश २० तारखेला प्राप्त झाल्यानंतर त्यांच दिवशी ऐनवेळी बैठकीत प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला होता प्रशासनाकडून कुठलीही दिरंगाई झालेली नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ऐनवेळी विषय दिला असेल त्यावर निर्णय घेणे आवश्यक आहे हे प्रशासनाने निदर्शनास आणून दयायला पाहिजे होते किंवा २१,२२,२३ तारखेला सभा आयोजित करून कार्यवाही व्हायला पाहिजे होती शेवटच्या दिवशी सभा घेवून चर्चा करणे कितपत योग्य आहे.

श्री.भगवान घडमोडे :इतर बाबीवर चर्चा न होता महत्वाचा उपकराचा विषय समोर आलेला आहे त्यावर चर्चा होवून निर्णय घ्यावा.महापालिकेचे हित बघावे.

मा.महापौर :प्रस्ताव कशाच्या आधारे,निकषावर ठेवला दर निश्चित करण्याचे अधिकार कुणाचे प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : काही महापालिकेत आचारसंहिता लागू असल्याने त्या उपकरातून वगळल्या असतील शासनाने भेदभाव केलेला नाही आरोप करणे बरोबर नाही. शासनाने उपकर लावून वचन नामा पुर्ण केला.

मा.महापौर :प्रस्ताव कशाच्या अधारे निकषावर ठेवला दर निश्चित करण्याचे अधिकार कुणाचे प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:या सभागृहाला अधिकार आहे,जे जकातीचे दर होते तेच कन्टीन्यूव करावे. सभागृहाचेही तेच मत आहे.आज निर्णय होणे आवश्यक आहे.

डॉ.भागवत कराड :जकात रद्द करून उपकर लावण्याची शासनाने मंजूरी दिली जकातीचे जे दर होते तेच लावावे. शासनाने वॅट हा १२.५० टक्के लावलेला आहे. मार्च अखेर उत्पन्न घेतले तर शासनाकडे ३६ हजार कोटी होतात.ज्या ज्या राज्यात शासनाने वॅट लावला तेथे इतर कुठलाही कर आकारणी होत नाही.त्याप्रमाणे या शासनाने सुध्दा करावयास पाहिजे असे वाटते. वॅटच्या उत्पन्नातून शासनाने काही टक्केवारीचे उत्पन्न म्हणून निधी दयायला पाहिजे.उपकर प्रमाणे आकारणी करणारच असेल तर शासनाने लावलेले उपकराचे दर दीडपट जास्त असून ते कमी करून जकाती एवढेच ठेवावे.ज्या मालावर जकात घेत नव्हतो त्यावर उपकर लावू नये.प्रवेश फिस ही १०० रू. प्रमाणे वर्षाला ८० लक्ष येतात. उपकर लावणार असेल तर ही फिस सुध्दा वसूल करावी लागेल.कारण ही फिस शहरातील नागरीकांना लागत नाही ती ज्या गाडया पास होतात त्यावर लागते.ते सुध्दा वसुल करण्याची गरज आहे. नगरपालिकेला जसा शासन कराच्या रूपाने निधी देते त्या प्रमाणे महापालिकेने सुध्दा मागणी करावी असे माझे मत आहे.

श्री.संतोष खेंडके :जकातीचे दर व शासनाने दिलेले दर या मोठी तफावत असून जास्तीचे दर दिले यावरून शासन या शहरातील व्यापारी तसेच जनतेची पिळवणूक करीत आहे.नोंदणी शुल्क कमी करण्यात यावे तसेच जीवनावश्यक वस्तूवर उपकर आकारणी होवू नये.

मा.महापौर :ज्या सुचना सदस्यांनी केल्या त्यांचा खुलासा प्रशासनाने करावा.

उपआयुक्त (म) :शासनाचे अद्यादेश प्राप्त झाल्यानंतर त्यात स्पष्ट उल्लेख आहे की १ नोंव्हे.२००८ पासून जकात ऐवजी उपकर लावण्या बाबत अंमलबजावणी करायची आहे. नियमानुसार उपकराची नोंदणी करण्याची मुदत दिली आहे.ज्या व्यापा-यांचा टर्नओव्हर मर्यादेपेक्षा जास्त होईल जे ७५,०००/- १,२५,०००/-रू.असे दोन कॅटॅगिरी दिली आहे. उपकराची नोंदणी अंमलबजावणी झाल्याच्या तारखेपासून २० दिवसात म्हणजे शेवटची तारीख ही २० नोव्हेंबर राहील. अमलबजावणीच्या तारखेनंतर ज्यांची टर्नमर्यादा क्रॉस होईल त्यांचेसाठी ३० दिवसाची मर्यादा असेल असे नियमात अद्यादेशा सोबत शासनाने शेडयूल दिले उपकर लावण्याच्या संदर्भात ९४ बाबी आहे.कमाल दर काय राहतील याची सुची दिली कमाल दराच्या पेक्षा कमी दर लावण्यासाठी सर्वसाधारण सभेला पूर्ण अधिकार आहे त्यापेक्षा जास्त दर लावायचे असेल तर शासनाची परवानगी घ्यावी लागेल.

श्री.देसरडा प्रशांत :जे दर सादर केले ते कोणत्या नियमाने केले याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर :कोणत्या नियमाने दर सादर केले शासनाचे दर व महापालिकचे दर यात फरक काय तसेच स.सभापती यांनी अशी विचारणा केली केली व्यापाऱ्यांनी मुदतीत रजिस्ट्रेशन केले नाही तर काय कार्यवाही होणार याचाही खुलासा व्हावा.

उपआयुक्त(म) :मुदतीत व्यापाऱ्यांनी नोंदणी केली नाही तर युआरडी (अन रजिस्टर्ड डिलर) जे असतील त्यांना आयात केलेल्या मालाच्या १० टक्के दंड आकारणी करू शकतो असे नियमात क्लिअर दिले आहे दिवानी न्यायालयाचे अधिकार दिलेले आहे. क्रॉस व्हेरिफिकेशन करता येते.

श्री.हिम्मतराव दाभाडे :जे दर दिले ते शासनाने दिले की प्रशासनाने ठेवले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :दर ठरविण्या बाबत नंतर निर्णय घेता येईल.जे होते तेच आकारावे आज जकात बदं होणार आहे उपकर लावण्यासाठी उदयापासून वेळ सुरू होते त्याचा विचार करावा.

श्री.देसरडा प्रशांत :जे दर दिले ते देण्याचे प्रशासनाला अधिकार आहे का ?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रशासनाला अधिकार नाही त्यामूळे मंजूरीसाठी आलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मुदतीत नोंदणी केली नाही तर डायरेक्ट संबधीत व्यापा-याच्या दुकानमध्ये असलेल्या मालाच्या १० पट दंड आकारू शकतो का ?

उपआयुक्त (म) :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार उपकर ठरविण्याचे अधिकार हे सर्वसाधारण सभेचे आहे.यापूर्वी जकात चालू होती जे प्रचलित दर होते त्या अनुशंगाने नागरीक व्यापारी यांची कुचंबणा होवू नये याचा विचार करून प्रशासनाने दर प्रस्तावित केले त्यामध्ये अंतिम मंजुरीचा अधिकार सभागृहाचा आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शासनाने जे दर दिले तेच प्रशासनाने ठेवायला पाहिजे होते.

उपआयुक्त (म) :उपकर आकारण्याचे दर हे विचारार्थ सभेसमोर ठेवले आहे अंतिम निर्णय सभागृहानेच घ्यायचा आहे.

श्री.देसरडा प्रशांत :प्रशासनाने शासनाच्या विरोधात जावून वेगळे दर ठेवले असे दर प्रस्तावित करण्याचा अधिकार प्रशासनाला नाही प्रशासनाची चूक झाली कबूल करावे विषय संपवावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासनाची यात काहीही चूक नाही.

मा.महापौर :जे स.सदस्यांनी प्रश्न विचारले त्यानूसार जे अधिकार या सभागृहाचे आहेत त्याचे प्रशासनाने यापूढे उल्लंघन करू नये असे आदेशीत करण्यात येते, याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :उपकराची अंमलबजावणी करण्यासाठी एप्रिल मध्ये निविदा काढली दर ठरले होते. त्यावेळी नोंदणी का केली नाही. प्रशासनाची चूक झाली आऊटसोर्स का केले.

उपआयुक्त (म) :उपकराची अंमलबजावणी कोणत्या तारखेपासून करावयाची आहे हे शासनाचे नोटीफिकेशन प्राप्त नव्हते आउट सोर्सीगचा निर्णय प्रशासकीय तयारीचा भाग आहे.

सौ.लता दलाल :हे उत्तर होऊ शकत नाही. एप्रिलमध्ये उपकराच्या बाबतीत ठराव घेतला निविदा काढल्या ठेका कुणाला दिला होता निविदा कुणी काढल्या आतापर्यत नोंदणी का केली नाही सर्व बाबींचा खुलासा व्हावा.

श्री.गजानन बारवाल :जकात रद्य व्हावी ही सर्वाचीच भुमिका आहे शासनाने निर्णय केला, अंमलबजावणी केंव्हापासून होते हा नंतरचा भाग होतो. आजची परीस्थितीशेवटच्या क्षणाला येवून पोहचली आज निर्णय घेणे गरजेचे आहे. दर निश्चित करतांना व्यापारी नागरीक यांचेशी चर्चा होणे आवश्यक होते ते सौजन्य दाखवले नाही. श्री.वैद्य,श्री.देसरडा यांच्या प्रश्नांचे उत्तर दिले नाही. प्रशासनाने दर ठेवले ते जास्त आहे यापेक्षा कमी असावे व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे उपकराच्या बाबतीत निर्णय घ्यायचा असेल तर काही बाबीची कार्यवाही करणे आवश्यक आहे स्वतःहून घोषित केले तर मान्य करता येत नाही. नोंदणी करण्यासाठी ७-८ ठिकाणी कार्यालय कार्यान्वित करावे. नोंदणी फिस १०० रू शासनाने दिले इतर खर्चापोटी ७००रू.लावले त्याऐवजी १०० +२५० रू.घेण्यात यावे.यापूर्वी टेंडर काढले असेल व संबधीतास वर्क ऑर्डर दिली नसेल तर ती त्वरीत थांबवावी. नोंदणी करतांना व्यापाऱ्यांना त्रास

होणार नाही याची दखल घ्यावी उपआयुक्त यांची प्रमाणपत्रावर सही असणार आहे कामाचा व्याप वाढणार असून जास्त प्रमाणपत्र कसे देता येईल याची दखल प्रशासाने घ्यावी. ज्या तृटी येतील त्या व्यापाऱ्यांच्या निदर्शनास प्रशासनाने आणून दयाव्यात. जकातीचे जे दर होते तेच जशाच्या तसे लागू करावे. दैनदिंन वस्तू जसे अन्नधान्य तुप,तेल,तांदूळ ई. यावर क्विंटल प्रमाणे आकारणी होत होती आता टक्केवारी प्रमाणे आले त्यासही पूर्वीप्रमाणेच आकारावे १२-१३ बॅकेत खाते ओपन करण्याची गरज आहे. उपकर बसविण्या संबंधी गेट टू गेदर करून व्यापाऱ्यांना माहिती देण्याची गरज आहे. प्रशासनाला ज्युडिशियल पावर आहे त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे करावी. जकात चालू असतांना व्यापा-यांना त्रास होत होता आता तो होणार नाही त्यासाठी प्रशासनाने त्याची भुमिका योग्य प्रकारे पार पाडावी लहान व्यापारी पानवाले,फेरीवाले,फ्रुट,स्टॉल यांना निश्चित दर ठेवावे. त्यामूळे त्यांना दिलासा मिळेल व ते होवून महापालिकेकडे येतील.शहरात येणारा व बाहेर जाणारा माल लगेच प्रशासनाने समजून घेवून व्यापा-यांना त्रास होणार नाही याची दखल घ्यावी.प्रपत्र भरणा करण्यासाठी १०ऐवजी २० तारीख करावी. पालेभाज्या मीठ व दुध यास सुट दयावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अनुसुची अ प्रमाणे दर लावणार यात ९४ ॲटम आहे २० तारखेला प्रशासनाकडे अध्यादेश आले त्यानंतर व्यापा-यांना माहिती होण्यासाठी प्रसार माध्यमातून नोटीफिकेशन देणे आवश्यक होते शासनाचे दरास विरोध असेल तर जकातीचे दर तात्काळ मंजूर करावे. येथे राजकारण नको.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:शासनाचे दर व प्रशासनाने ठेवलेले दर हे रद्द करण्याचा अधिकार सभागृहाला आहे. सर्वांचे मत असेल माफ करायचे तर तसे मान्य करावे.

श्री.संजय केनेकर :पहिल्यांदा वर्तमान पत्रात घोषित केले जाते. सभागृहात फक्त सहयासाठी रजिष्टर ठेवा सभागृह नेता यांनी ज्या सूचना सभागृहाच्या सम्मतीने मांडल्या त्यास मी सहमत आहे. विकास शासनामूळे थांबलेला आहे. या महापालिकेला पूर्ण वेळ आयुक्त असावे.

श्री.विनायक पांडे :आताच सभागृह नेता यांनी ज्या सुचना केल्या व जे जकातीचे दर होते त्यानूसार मान्यता दयावी.

डॉ.भागवत कराड :यात शासनाने जी कमाल मर्यादा दिली ते मंजूर करू नये जकातीचा जो दर होता त्याप्रमाणे उपकर आकारणी करण्यास मान्यता दयावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ज्या वस्तूवर जकात माफी होती त्यावर उपकराची माफी मिळावी.

मा.महापौर :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (अ अ) मध्ये दिनांक ०३ ऑक्टोंबर २००८ च्या शासन राजपत्रात सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.७ अन्वये झालेल्या दुरूस्तीनुसार शासनाने महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.सीईएस ०२०८/प्र.क्र.५७/नवि-३४ मुंबई दिनांक २१ ऑक्टोंबर २००८ नुसार ०१ नोव्हेंबर २००८ पासून जकाती ऐवजी उपकर बसविणेचे निर्देश दिलेले आहे. तसेच त्यासोबत अनुसूची अ मध्ये उपकराचे कमाल दर दिलेले आहे सदर उपकर दिनांक ०१.११.२००८ पासून अंमलात येत असल्याने व या संबंधात सखोल अभ्यास करून योग्य दर निश्चितीसाठी पुरेसा वेळ नसल्याने तसेच महानगरपालिकेच्या सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीचा विचार करून आणि प्रशासनातर्फे सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार करता जकातीचे जे दर आहेत त्याच दराने उपकराची आकारणी करावी. तसेच जकातीचे दर काही

मालावर नगाने,प्रती टन,प्रती क्विंटल, व जकात माफिने असे आहेत याच प्रमाणे उपकराची वसुली व्हावी. जकातीचे शेडयूल " ओ "मध्ये ज्या मालावर जकात माफ होती त्यावर उपकर ही माफ करावे त्या मालावर उपकर लागणार नाही या दुरूस्ती सह विषय क्र.३३३ याला मंजूरी देण्यात येते. तात्पुरत्या स्वरूपातच हे करतो आहोत. तसेच वॅटच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडे ३६ हजार कोटी रूपये जमा आहे ती रक्कम योग्य प्रमाणात महानगरपालिकेस वाटा म्हणून दिली गेली पाहिजे असे या सभागृहाचे मत आहे. उपकर लागल्यामूळे जे काही महापालिकेचे खात्रीलायक उत्पन्न येणार होते ते आता बंद होणार आहे. उपकरापासून निश्चित किती उत्पन्न येईल हे आपणांस सांगणे शक्य नाही. परंतू महानगरपालिकेचा जो दैनंदिन खर्च आहे तो करणे आवश्यक आहे त्यात विकास कामे व कर्मचाऱ्यांचे पगार पाण्यापोटी येणारे लाईट बील अदा करणे ही अत्यंत महत्वाची जबाबदारी महापालिकेची आहे. हे सर्व होण्यासाठी वेळ लागत असल्याने लगेच उत्पन्न किती येईल हे आज सांगता येणार नाही अशी परीस्थिती आज समोर आहे. खात्रीदायक उत्पन्न डोळयापूढे ठेवून मागील अर्थसंकल्पास मंजूरी दिलेली आहे महानगरपालिकेचे जे खात्रीदायक उत्पन्न मिळणार होते ते आता कधी आणि कसे मिळेल याची खात्री वाटत नाही. त्याची भरपाई म्हणून शासनाने अनुदान स्वरूपात अनुदानाची रक्कम अग्रिम म्हणून महापालिकेला द्यावी आणि जो आज अवघड प्रसंग महापालिकेवर आला या महापालिकेने शासनाला नेहमीच सहकार्य केलेले आहे आजही सहकार्याची भुमिका घेतो आहोत जी परीस्थिती समोर येणार आहे सध्या काही काळापूरती ती अतिशय अवघड आहे.म्हणून आज हे जरी महापालिकेने मान्य केले असले तरी शासनाने या बाबतीत पॉझीटीव्ह भुमिका घेतली पाहिजे. महापालिकेला अनुदान स्वरूपामध्ये अनुदानाची रक्कम अग्रीम म्हणून दिली पाहिजे. महापालिकेला करावयाची कामे व इतर खर्च याची जाणीव शासनाच्या मनामध्ये नक्कीच असेल. त्यामूळे अग्रिम रक्कम शासनाने द्यावी हा महत्वाचा विषय आहे तो आम्हाला कळविणे अत्यंत आवश्यक आहे. असे या सभागृहाचे मत आहे. वॅटच्या माध्यमातून शासनाकडे ३६ हजार कोटी रूपये जमा आहे त्यातील योग्य रक्कम ही महापालिकेला वाटा म्हणून दिली पाहिजे. अनेक सदस्यांनी भावना व्यक्त केल्या की, जो उपकर शासनाने लावलेला आहे तो जास्त आहे व्यापाऱ्यांनी निदर्शने तसेच जो लढा दिला त्यांना कर कमी करून हवा होता हे प्रत्यक्षात दिसते आहे. जे दर दिले ते जास्त आहे. उपकर किंवा जकात असा कोणताच विषय न ठेवता वॅटमधून महापालिकेला वाटा देण्यात यावा. अशी सभागृहाची भुमिका आहे. त्यानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी असे आदेशीत करण्यात येते. या सोबतच उपकराच्या अमंलबजावणीकरीता अधिकाधिक नोंदणी कार्यालय सुरू करावी शासनाने सांगितल्या नुसार नोंदणी चार्जेससह जे ६५० रूपये प्रशासकीय खर्च घेणार होतो ते एवढे न घेता व्यापाऱ्यांकडून फक्त ३००+१०० रू घेण्यात यावे. प्रमाणपत्र ताबडतोब देणे गरजेचे आहे त्यावर उपआयुक्त यांचे स्वाक्षरी असेल ते लवकरात लवकर वितरीत करावे. सर्व उद्योजक,व व्यापारी तसेच इतर जे जे उपकर भरणारे आहे त्या सर्वांना विश्वासात घेण्यात यावे. त्याची मदत घेवून उपकर अधिक चांगला कसा राहील व महापालिकेने उत्पन्न जास्तीत जास्त कसे वाढेल याची प्रशासनाने काळजी

घ्यावी. उपकर अंमलबजावणीसाठी प्रशासनाने सर्व वर्तमानपत्रात व्यापारी उद्योजक व नागरीकांच्या माहितीस्तव जाहीर नोटीस प्रसिध्द करून नागरीकांना माहिती दिली पाहिजे. शहरातील सर्व व्यापारी,उद्योजक व जे जे उपकर भरणार आहेत त्या सर्वांनी विश्वास ठेवून काम करण्याची महापालिकेची भुमिका आहे सर्व व्यापारी व उद्योजकांना विनंती की सर्वांचीच ही महापालिका आहे त्यासाठी पॉझीटिव्ह दृष्टीकोन समोर ठेवून लवकरात लवकर उपकराच्या बाबत नोंदणी करून उपकर भरावा व महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येते. या पध्दतीने या विषयास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासनाचे सन २००८ चा महाराष्ट्र अद्यादेश क्र.७ व या संबंधीत अधिसूचना क्र.सीईएस-०२०८/प्र.क्र.५७/नवि-३४, दिनांक २१ ऑक्टोंबर २००८ अन्वये जकाती ऐवजी दिनांक १ नोव्हेंबर २००८ पासून उपकर बसवण्याचे निर्देश दिलेले असल्याने उपकराच्या प्रदानास पात्र असलेल्या अद्यादेशातिल अनुसूचि ''अ'' मधील ९४ वस्तुनिहाय बाबींवर उपकराचे कमाल दर दर्शविलेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अ (१) (१ अ-१) यास अधिन राहून जकात दराचे शेडयूल ''ओ''मध्ये जे दर दर्शविलेले आहे त्याच दराप्रमाणे व त्या प्रमाणात जकाती ऐवजी उपकराचे दर लावण्यास मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन अधिसूचना-क्रं.सीईएस-०२०८/प्र.क्र.५७/नवि-३४, मुंबई -३२ दिनांक २१ ऑक्टोबर -२००८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत ०१ नोव्हेंबर २००८ पासून जकात ऐवजी उपकर लागू करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ (इ) नुसार उपकर विभागात काम करणाऱ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांची पदनाम बदलणे बाबत तरतूद आहे. त्यानुसार सध्या जकात विभागात कर्मचाऱ्यांच्या पदनामात खालीलप्रमाणे बदल करण्यासाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

| | जकात विभागातील सध्याचे पदनाम | उपकर विभागासाठी द्यावयाचे पदनाम |
|---|---|---|
| ०१. | जकात अधिक्षक | उपकर अधिकारी |
| ०२. | सहाय्यक जकात अधिक्षक | सहाय्यक उपकर अधिकारी |
| ०३. | जकात निरीक्षक | उपकर निरीक्षक |

करीता उक्त पदनाम बदलण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :यास मान्यता दयावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे कुणी उपकर विभागात अधिकारी येतील त्यांना ते पदनाम दयावे. ते कायमस्वरूपी राहणार नाही. ज्या कोणी कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती होईल त्यांना पदनाम देण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : जकात अधिक्षक या पदासाठी जी पात्रता,अनुभव लागतो. उपकर अधिकारी म्हणून काम करतांना जी पात्रता शिक्षण,अनुभव यात तफावत असू शकते पदनाम एक असेल तरी कामाचे स्वरूप वेगळे असल्यामूळे वेगळे निकष ते या ठिकाणी नमूद करण्याची आवश्यकता आहे.

मा.महापौर : ज्याची त्या पदावर नियुक्ती होईल त्या पदावर असेल त्यांनाच ते पदनाम राहील आताच स.सदस्य श्री.काशिनाथ कोकाटे यांनी सुचना केल्याप्रमाणे दुरूस्तीसह हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन अधिसूचना-क्रं.सीईएस-०२०८/प्र.क्र.५७/नवि-३४,मुंबई -३२ दिनांक २१ ऑक्टोबर -२००८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत ०१ नोव्हेंबर २००८ पासून जकात ऐवजी उपकर लागू करण्यात येत असल्यामूळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ (इ) नुसार उपकर विभागात काम करणाऱ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांची पदनाम बदलणे बाबत तरतूद असून त्यानुसार सध्या जकात विभागात कर्मचाऱ्यांच्या पदनामात खालीलप्रमाणे बदल करण्यास तसेच ज्याची त्या पदावर नियुक्ती होईल त्या पदावर असेल त्यांनाच ते पदनाम राहील या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| | **जकात विभागातील सध्याचे पदनाम** | **उपकर विभागासाठी द्यावयाचे पदनाम** |
|---|---|---|
| ०१. | जकात अधिक्षक | उपकर अधिकारी |
| ०२. | सहाय्यक जकात अधिक्षक | सहाय्यक उपकर अधिकारी |
| ०३. | जकात निरीक्षक | उपकर निरीक्षक |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गट **क** व **ड** मधील कर्मचाऱ्यांना सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने सानुग्रह अनुदान अदा करण्यात येईल असे मा.महापौर यांनी आश्वासित केले आहे. या नुसार सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी ज्या दराने सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले, त्यानुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान खालीलप्रमाणे :

१) दिनांक ०५ नोव्हेंबर १९९९ च्या शासन निर्णयानुसार परिगणना वित्त मर्यादा रू.२५००/- जी की एकतीस दिवसांकरिता असून महानगरपालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यांना चालू वर्षाकरीता ३० दिवसासाठी रू.२४१९/- प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करण्याचा निर्णय प्रस्तावित करण्यात येत आहे. यासाठी महापालिकेतील ४१७८ कर्मचारी बोनसपात्र असून त्याच्यासाठी रू.१,०१,०६,५८२/- इतका खर्च अपेक्षित आहे.

२) ३०० दैनिक वेतन,ठराविक वेतन बालवाडी शिक्षिका व सेविका हे सानुग्रह अनुदानास पात्र नसल्यामूळे त्यांना दिवाळी भेट म्हणून रू.१५००/- अदा करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. यासाठी रू.४,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिकेच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकात रू.१,०५,५६,५८२.००/- वाढीव तरतूद करावी लागेल करिता सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्याच्या मान्यतेस्तव व सानुग्रह अनुदान व दिवाळी भेट कर्मचाऱ्यांना अदा करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : आपण दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान व दिवाळी भेट निमित्त सर्वांना विश्वासात घेवून निर्णय घेतला यबद्दल अभिनंदन.

मा.महापौर : महानगरपालिकेचे स.पदाधिकारी,स.पालिका सदस्य तसेच प्रशासनाने देखिल मदत केलेली आहे. सर्वांचे मन:पुर्वक आभार. हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गट **क** व **ड** मधील कर्मचाऱ्यांना सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान खालीलप्रमाणे अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१) दिनांक ०५ नोव्हेबंर १९९९ च्या शासन निर्णयानुसार परिगणना वित्त मर्यादा रू.२५००/- जी की एकतीस दिवसांकरिता असून महानगरपालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यांना चालू वर्षाकरीता ३० दिवसासाठी रू.२४१९/- प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करणेसाठी महापालिकेतील ४१७८ कर्मचारी बोनसपात्र असून त्याच्यासाठी रू.१,०१,०६,५८२/- इतका खर्च अपेक्षित आहे.
२) ३०० दैनिक वेतन,ठराविक वेतन बालवाडी शिक्षिका व सेविका हे सानुग्रह अनुदानास पात्र नसल्यामूळे त्यांना दिवाळी भेट म्हणून रू.१५००/- अदा करणेसाठी रू.४,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच महानगरपालिकेच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकात रू.१,०५,५६,५८२.००/- वाढीव तरतूद करणेसही मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३३६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड लगत असलेल्या महसूल प्रबोधिनीच्या शासकीय जागेवर DPDC अंतर्गत प्राप्त होणाऱ्या रू.५०.०० लक्ष निधीमधून राज्यातून विविध शैक्षणिक सहलीसाठी येणाऱ्या विद्यार्थी पर्यटकांसाठी टुरीस्ट सेंटर बांधण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावास व जागेस मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकून तत्वतः मान्यता आहे. सदरील इमारत महानगरपालिकेतर्फे बांधण्याचा प्रस्ताव असून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारत महसूल प्रबोधिनी/ शासनास हस्तांतर करण्यात येईल.

करीता महसूल प्रबोधिनी / प्राधिकरण यांचे नाहरकत प्रमाणपत्र व मनपाच्या पॅनलवरील वास्तुविशारद /अभियंता, अनुभवी आर्किटेक्ट यांचे मार्फत सविस्तर नकाशे, अंदाजपत्रक व देखरेख इत्यादीसह नियमानुसार एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५ टक्के मानधनासह प्रस्ताव नगर रचना विभागाचे छाननी व मान्यतेच्या अधिन राहून व वस्तीगृह / टुरीस्ट सेंटर बांधण्याच्या प्रस्तावास व रू.५०.०० लक्ष च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

सौ.लता दलाल :जागा शासनाची निधी डीपीडीसीचा बांधकाम झाल्यानंतर शासन हस्तातरीत करून घेणार यात महापालिकेने बांधावे परंतु ताबा महापालिकेचा असावा हा प्रस्ताव ठेवण्याचे प्रयोजन काय, नेमकी महापालिकेची भुमिका काय खुलासा व्हावा.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

डॉ.भागवत कराड :डीपीडीसीच्या माध्यमातून ५० लक्षचे टुरीस्ट सेंन्टर या शहरात शासनाच्या जागेवर बांधले जाते.महापालिका ही सक्षम एजन्सी आहे असे शासनाच्या मनात असावे असे वाटते. हे टुरीस्ट सेंटर झाल्यानंतर जे काही विदयार्थी, पर्यटक येतील त्यांचेसाठी मोठी सुविधा होणार आहे. याचे मॅनेजमेंन्ट हे मा.महापौर,मा.आयुक्त किंवा महापालिकेच्या माध्यमातून असावे त्यांचा महापालिकेला फायदा होईल असा बदल करून यास मान्यता दयावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :महापालिका एक न्युडल एजन्सी आहे प्रस्ताव मान्य करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यात मा.महापौर, मा. आयुक्त यांचा समावेश करावा म्हणून शासनाकडे मागणी करू शकतो. शासनाचा महापालिकेवर भरवसा आहे त्यामूळे एजन्सी म्हणून फिक्स केले.

कार्य.अभियंता(ड्रे.विद्यु.):हा प्रस्ताव स्वयं स्पष्ट आहे. शहरात आपल्या माध्यमातून होते. डीपीडीसी कडून ५०लक्ष रक्कम या शहरात टुरीस्ट सेंन्टर बांधकामासाठी रक्कम मिळेल हे काम महापालिकेच्या वतीने होत असेल तर चांगलेच आहे

सौ.लता दलाल :शासनाची जागा शासनाचा निधी ठेकेदारी महापालिकेने करायची का?

कार्य.अभियंता(ड्रे.विद्यु) :यासाठी मा.जिल्हाधिकारी यांनी जागेची मागणी केली होती जागा देवू शकलो नाही त्यावर असे सजेशन दिले की महसूल प्रबोधिनीचे कॅम्पस मध्ये जागा आहे हा चांगला उपक्रम असून बाहेरील येणारे विदयार्थी यांना निवासाची व्यवस्था नसते त्यांचेसाठी फायदयाचे असून महापालिकेचे यात नाव असणार आहे. चांगला उपक्रम आहे.

सौ.लता दलाल : महापालिकेकडे कुणी गेस्ट आल्यास त्यांना राहण्याची व्यवस्था होवू शकेल तेवढे अधिकार महापालिकेला असावेत असे नमूद करावे.

कार्य.अभियंता(ड्रे.विद्यु):जी नियामक मंडळावर कमेटी असेल यात महापालिकेचा सहभाग असावा असा ठराव करून समावेश करता येईल. तसे मा. जिल्हाधिकारी यांना तसे कळविण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :बाहेर गावाहून सहलीसाठी येणा-यां विदयार्थ्यासाठीच आहे इतरा साठी नाही.यास मंजूरी देण्यास हरकत नसावी.

डॉ.भागवत कराड :मान्यता देण्यात यावी.

मा.महापौर :या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. या ठिकाणी प्रस्तावीत टुरीस्ट सेंटर स्थापीत झाल्यावर त्यासाठीचे जे नियामक मंडळ स्थापन होईल त्या नियामक मंडळामध्ये महापालिकेचे महापौर व आयुक्त अथवा त्यांनी नेमलेला कोणताही एक अधिकारी हे या नियामक मंडळाचे सदस्य सचिव असतील जेणे करून टुरीस्ट सेंटरच्या दैनंदिन कारभारात महापालिकेचा सक्रीय सहभाग राहील. यात महापौर सुध्दा त्या नियामक मंडळामध्ये असतील व महापालिकेला तसे अधिकार असतील. सदरची अट जिल्हाधिकारी यांना कळवावी आणि त्यांची समंती असल्यास प्रकरणी पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड लगत असलेल्या महसूल प्रबोधिनीच्या शासकीय जागेवर DPDC अंतर्गत प्राप्त होणाऱ्या रू.५०.०० लक्ष निधीमधून राज्यातून विविध शैक्षणिक सहलीसाठी येणाऱ्या विद्यार्थी पर्यटकांसाठी टुरीस्ट सेंटर बांधण्यास व सदरील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारत महसूल प्रबोधिनी/ शासनास हस्तांतर करण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच महसूल प्रबोधिनी / प्राधिकरण यांचे नाहरकत प्रमाणपत्र व महापालिकेच्या पॅनलवरील वास्तुविशारद / अभियंता, अनुभवी आर्किटेक्ट यांचे मार्फत सविस्तर नकाशे, अंदाजपत्रक व देखरेख इत्यादीसह नियमानुसार एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५ टक्के मानधनासह प्रस्ताव नगर रचना विभागाचे छाननी व मान्यतेच्या अधिन राहून व वस्तीगृह / टुरीस्ट सेंटर बांधण्याच्या रू.५०.०० लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते तसेच प्रस्तावीत टुरीस्ट सेंटर स्थापीत झाल्यावर त्यासाठीचे जे नियामक मंडळ स्थापन होईल, कोणताही एक अधिकारी हे या नियामक मंडळाचे सदस्य सचिव असतील,महापौर सुध्दा त्या नियामक मंडळामध्ये असतील,सदरची अट जिल्हाधिकारी यांना कळवावी आणि त्यांची समंती असल्यास प्रकरणी पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३३७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वातंत्र्य सैनिक कै.हिरूभाऊ जगताप यांच्या संग्रहातील पुराणवस्तु महानगरपालिकेस दान देण्याची इच्छा श्रीमती सुशिलाबाई जगताप यांनी व्यक्त केली आहे. श्रीमती सुशिलाबाई जगताप यांच्याकडे जून्या वस्तुचा संग्रह करण्यात आलेला आहे. यामध्ये नाणी, सोन्याचे जूने दागिने,बंदुका,चिलखते,जुने वस्त्र इत्यादी पुराण वस्तुंचा समावेश आहे. या सर्व पुराणवस्तु अमुल्य आहेत. अशा अमुल्य वस्तु नागरिकांनी पाहाव्यात म्हणून नागरीकांसाठी या वस्तु महानगरपालिकेला दान देण्यास त्या इच्छुक आहेत. त्यामूळे महानगरपालिकेने पुढाकार घेवून या वस्तु जतन करणे व प्रदर्शित करणे ही बाब स्वागतार्ह ठरेल.

कै.हिरूभाऊ जगताप यांचा हा संपूर्ण वैयक्तिक संग्रह असून, त्यांच्या नावाने तो पूढे अजरामर राहावा ही श्रीमती सुशिलाबाई जगताप यांची इच्छा आहे. सदरील मौल्यवान पुराण वस्तु स्विकारून या सर्व वस्तु श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात स्वांतत्र्य सैनिक स्व.हिरूभाऊ जगताप यांचे नावे स्वतंत्र दालन सुरू करून जतन करण्यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२१/५ दिनांक २०.०८.२००३ अन्वये सर्वानुमते मंजूरी आहे.

सद्यस्थितीत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे स्वतंत्र दालन उपलब्ध नसल्यामूळे महानगरपालिकेच्या ऐतिहासिक टाऊन हॉल इमारतीमध्ये होवू घातलेल्या कला दालनामध्ये इमारतीच्या वरच्या मजल्यावर हा संग्रह प्रदर्शीत करता येईल. ज्यामूळे नागरीकांना त्याचा लाभ घेता येईल व कला दालनास भेट देणाऱ्या नागरीकांची संख्याही वाढेल तसेच आपल्या इतिहासासंदर्भात नागरीकांना माहिती मिळेल. सदरील दालनास भेट देण्यासाठी चूकीच्या व्यक्ती येवू नये म्हणून व मौल्यवान वस्तु खराब होवू नये म्हणून कला दालनास भेट देणाऱ्या व्यक्तीकडून रूपये ५/- प्रति व्यक्ती याप्रमाणे प्रवेश फि आकारणे योग्य राहील. सदरील मौल्यवान वस्तु कला दालनाचे ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी साधारणपणे रूपये २०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. या खर्चातून शो केसेस आणि त्या अनुषंगिक फर्निचर व सुरक्षतेच्या दृष्टीने कामे करता येतील.

श्रीमती सुशिलाबाई जगताप यांच्याकडील दुर्मिळ मौल्यवान पुराणवस्तु स्विकारण्यासंदर्भात सदरील वस्तुंची यादी करणे/ त्यांची नोंदणी करणे, विविध कोनातून फोटोप्रती तयार करणे, वस्तुंबाबतची सविस्तर माहिती तयार करणे, दुर्मिळ वस्तुंचे मुल्यांकन करून विमा उतरविणे, वस्तु ताब्यात घेवून प्रदर्शित करणे याकरीता श्री.विजय जावरे,संचालक,महानगरपालिका कला दालन, श्री.जयंत खरवडकर,समन्वयक,हेरिटेज संवर्धन समिती आणि श्री.अब्राहम पॅथ्रोस,वास्तु विशारद यांची समिती गठीत करून समिती मार्फत उपरोक्त कामे करणे योग्य राहील.

करीता श्रीमती सुशिलाबाई जगताप यांच्याकडील ऐतिहासिक मौल्यवान वस्तु समितीमार्फत ताब्यात घेणे व कला दालनात प्रदर्शित करणे व यासाठी लागणारा खर्च रूपये २०.०० लक्षची तरतूद उपलब्ध करून देणे त्याचप्रमाणे कला दालनास भेट देणाऱ्या व्यक्तीकडून रूपये ५/- प्रवेश फीस आकारणी करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.प्रशांत देसरडा :सन २००१ मध्ये ५२० नाणी श्री.रमेश ऋणवाल यांचेकडून घेतली होती करारनामा केला ती नाणी अदयाप तशीच पडून आहे त्यासाठी स्वतंत्र दालन केले नाही. ते का केले नाही तसेच या संग्रहालयातील अनेक ठिकाणी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. पावसाळयात छत गळते ते अदयाप दुरूस्त केले नाही.त्यासाठी असलेल्या कमेटीत कोण आहे त्यांचे आजपर्यत किती बैठका झाल्या काय काम केले सर्व माहिती मिळावी.

श्री.दत्ताभाउ पाथीकर :हा प्रस्ताव मंजूर करावा आताच सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे यापूर्वी घेतलेल्या नाणी यासाठी स्वतंत्र दालन करावे.

श्री.कटकटे सतीष :ज्यांनी नाणी दिली त्यांनी यापुर्वी कधी अर्ज दिला होता का? त्यांची मागणी काय आहे. का विलंब झाला. त्याची चौकशी करावी.

श्री.प्रशांत देसरडा :श्री.ऋणवाल यांनी दिलेल्या नाणी प्रमाणे या पूराणवस्तूची अवस्था होवू नये.

श्री.काशिनाथ कोकाटे : ५रू. प्रवेश फिस ठेवली ती रद्द करून या प्रस्तावास मान्यता दयावी.

श्रीमती कला बोरामणीकर:२० लक्ष खर्च यात दाखविला आहे. वार्डात विकास कामे होत नाही यास मान्यता देवू नये.

श्री.सतीष कटकटे :मान्यता दयावी.

मा.महापौर : टाऊन हॉल इमारतीच्या वरच्या मजल्यावर स्थापीत होणा-या नियोजीत वस्तुसंग्रहालयाचे कामासाठी लागणारा जो खर्च दिला त्यास मंजूरी देण्यात येते. या सोबतच जी समन्वय समीती गठीत करीत आहोत त्यास ही मान्यता

देण्यात येते. समन्वयाने या समीतीने काम करून संग्रहालयाची उभारणी करावी तीन महिण्यांचे आत टाउन हॉल येथे कला दालन उभे करावे. कोणतीही प्रवेश फिस आकारण्यात येवू नये या दुरूस्तीसह मान्यता देण्यात येते.

तसेच यापूर्वी ५२० नाणी २००१ पासून महापालिकेकडे पडून आहे त्यासाठी दालन केले नाही त्यासाठी सुध्दा योग्य ठिकाणी दालन करून व्यवस्थीत मांडणी करून ठेवावे.असे आदेशीत करण्यात येते. या दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सुशिलाबाई जगताप यांच्याकडील ऐतिहासिक मौल्यवान वस्तु समितीमार्फत ताब्यात घेणे व कला दालनात प्रदर्शित करणे व यासाठी लागणारा खर्च रूपये २०.०० लक्षची वित्तीय तरतूद उपलब्ध करून देणे तसेच प्रस्तावात नमूद समन्वय समिती गठीत करणेसही मान्यता देण्यांत येते. तसेच समन्वयाने या समीतीने काम करून संग्रहालयाची उभारणी करावी तीन महिण्यांचे आत टाउन हॉल येथे कला दालन उभे करावे. कोणतीही प्रवेश फिस आकारण्यात येवू नये तसेच यापूर्वीची श्री.रमेश ऋणवाल यांचेकडून ताब्यात घेतलेली ५२० नाणी २००१ पासून महापालिकेकडे पडून आहे त्यासाठी दालन केले नाही त्यासाठी सुध्दा योग्य ठिकाणी दालन करून व्यवस्थीत मांडणी करून ठेवावे इत्यादी दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३३८ :</u>**

मा.सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जय टॉवर,पदमपुरा,औरंगाबाद येथील समावेक्षक आरक्षण (Reservation Accomodation) इमारतीमध्ये भु मजला + दोन मजले अशी महानगरपालिकेच्या मालकीची वास्तु आहे. या इमारतीमधील Lower Ground Level मध्ये भाजी मंडई (Veg Market) प्रस्तावित होती. परंतु त्या ठिकाणी भाजी मंडई होवू शकली नाही. सद्यस्थितीत सदर वास्तु रिकामी आहे.

सदरील ठिकाणी मा.महापौर व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी बचत गटासाठी स्माईल सेंटर सुरू करणे बाबत पाहणी केली आहे. व या ठिकाणी आडतीस गाळयासाठी बचत गटाच्या प्रॉडक्टच्या विक्रीसाठी ग्रिल व गेट लावून रंगकाम करून सदरील मार्केट विकसीत करणेचा प्रकल्प विभागा मार्फत प्रस्ताव आहे.

सदरील प्रकरणातील पूर्वपिठीका पाहता मा.स्थायी सामितीने दिनांक ०२.०८.२००४ च्या सभेत शिफारस केल्यानुसार शहर अभियंता,सहाय्यक संचालक नगर रचना,मुख्य लेखाधिकारी व उप आयुक्त (महसुल)यांची एक समिती गठीत केलेली होती. या समितीने तळघरामध्ये ५९६.२२ चौ.मी. (३८ गाळे) ची भाजी मंडई काही अटीवर (कृत्रीम वायुव्हिजन) अनुज्ञेय करणेची शिफारस केली होती त्यास मा.स्थायी समितीने दिनांक १३.०१.२००५ चे सभेमध्ये विषय क्रमांक १७४ अन्वये मंजुरीसाठी शिफारस केली. व त्याप्रमाणे वैधानिक कार्यवाही करणेसाठी ठराव पारीत केला.

असे असले तरी भाजी खरेदीसाठी येणाऱ्या नागरीकांच्या दृष्टीकोनातुन तळघरातील भाजी मंडईचा वापर सुलभ होईल असे वाटत नाही. त्यामुळे येथे भाजी मंडई अनुज्ञेय करण्यात येऊ नये असे मत आहे. तथापी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ आदेशार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.गजानन बारवाल :मान्यता दयावी.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

श्री.काशिनाथ कोकाटे :महिला बचत गटांना हे देत असतांना या संदर्भात एक नियमावली तयार करावी शहरात अनेक महिला बचत गट आहे त्यांना नियमात बसून

योजनेचा लाभ दयावा.यापूर्वी बचत गटांना वाहन खरेदी करून दिले होते तो प्रकार यात होवू नये.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अनुसूचित जाती जमातीसाठी ५% आरक्षण ठेवावे.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो. जय टॉवर्स पदमपुरा येथील समावेशक आरक्षण अंतर्गत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत महापालिकेच्या मालकीच्या वास्तुमधील तळघरात भाजी मंडई नियोजीत आहे परंतु सद्यस्थितीत त्या ठिकाणी तांत्रिक दृष्टया भाजी मंडई सुरू होवू शकली नाही त्यामुळे अनेक वर्षापासून ही जागा विनावापर रिकामी पडली आहे त्यामूळे या जागेचा योग्य वापर होणेच्या दृष्टीने जागेच्या वापरात बदल करणे आवश्यक आहे. या ठिकाणी स्माईल सेंटरसाठी वापर अनुज्ञेय केल्यास विविध बचत गटांना समाजातील सर्व मागासवर्गीय व इतर घटकांना सोबत घेवून महापालिकेच्या नियमानुसार अटी शर्ती घालून वापरासाठी देण्यात यावी.तळघराचा भाजी मंडईसाठीच्या वापरात बदल करून विविध बचत गटांसाठी आणि महिलानी तयार केलेल्या वस्तूसाठी स्माईल सेंटर स्थापित करणेसाठी वापर अनुज्ञेय करण्यात येते या वापराला मंजूरी देण्यात येते. या खर्चाचा ढोबळमानाने विचार करता आवश्यक निधी रूपये १५.०० लक्षच्या वित्तीय तरतुदीसाठी देखील मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जय टॉवर्स पदमपुरा येथील समावेशक आरक्षण अंतर्गत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत महापालिकेच्या मालकीच्या वास्तुमधील तळघरात भाजी मंडई नियोजीत आहे परंतु सद्यस्थितीत त्या ठिकाणी तांत्रिक दृष्टया भाजी मंडई सुरू होवू शकली नसल्यामूळे, अनेक वर्षापासून ही जागा विनावापर रिकामी पडली असल्यामूळे,या जागेचा योग्य वापर होणेच्या दृष्टीने जागेच्या वापरात बदल करणेस व या ठिकाणी स्माईल सेंटरसाठी वापर अनुज्ञेय करणेस आणि विविध बचत गटांना समाजातील सर्व मागासवर्गीय व इतर घटकांना सोबत घेवून महापालिकेच्या नियमानुसार अटी शर्ती घालून वापरासाठी देण्यास व तळघराचा भाजी मंडईसाठीच्या वापरात बदल करून विविध बचत गटांसाठी आणि महिलानी तयार केलेल्या वस्तूसाठी स्माईल सेंटर स्थापित करणेसाठी वापर अनुज्ञेय करण्यास आणि या कामासाठी येणाऱ्या खर्चास रूपये १५.०० लक्षच्या वित्तीय तरतुदीसही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद